# University of Mumbai


दुरध्वनी क्र. ०२२-२२७० ८७३८
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com

सांख्यिकी कक्ष
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई - ४०० ०३२.


**No. UDSTAT/ICD/2018-19/ 43 of 2018**

दिनांक : २९ जून, २०१८

परिपत्रक :-

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षाच्या विद्यार्थी संख्येबाबतची ऑनलाईन माहिती भरणेबाबत.

संदर्भ : **UDSTAT/ICD/2017-18/ 104 of 2017, dated 3/11/2017.**

---

महोदय/महोदया,

सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था यांचे प्रचार्य व संस्था प्रमुख यांचे उपरोल्लेखित केलेल्या विषयांकित संदर्भाकडे लक्ष वेधू इच्छितो की, प्रति शैक्षणिक वर्षानुसार उल्लेखित केलेल्या विषयाबाबतची माहिती ही आपल्याकडून मागविली जाते. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षाकरीता सुद्धा संबंधित ऑनलाईन माहिती सदर कक्षास अपेक्षित होती. सदर माहितीद्वारे विविध प्राधिकरणास व माहितीच्या अधिकरांतर्गत विचारात येणा-या विषयाबाबत महत्वपूर्ण असलेली माहिती केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या विविध प्राधिकरणांना/विभागांना व माहितीचा अधिकार, २००५ अन्वये असलेली माहिती वेळेत पाठविणे गरजेचे असल्याकरणाने ती आपल्यामार्फत ऑनलाईन स्वरूपी सादर करणे **अत्यंत आवश्यक बाब आहे.**

उपरोक्त बाब लक्षात घेता, संबंधित ऑनलाईन माहिती भरून घेण्यासाठी कक्षामार्फत अनेक स्मरणपत्राद्वारे, ईमेलद्वारे, दूरध्वनीद्वारे इ. विविध माध्यमातून सुचित करून देखील ती दिलेल्या दिनांकास किंवा तत्पुर्वी भरलेली नसल्यामुळे **वरिष्ठ अधिकारी वर्ग यांच्याकडून तीव्र नाराजी व्यक्त केली असून सदर महाविद्यालये व संस्था यांच्यावर कायदेशीर कार्यवाही का होऊ नये? अशी विचारणा केली जात आहे.**

तरी सर्व नमूद केलेल्या गोष्टींचा योग्य तो विचार करून आपण महाविद्यालये/संस्था यांचे प्रमुख या नात्याने संबंधित विषयाकडे वैयक्तिक लक्ष देवून अत्यावश्यक असलेली ऑनलाईन माहिती **दिनांक ०२ जुलै, २०१८ पर्यंत** कोणतीही सबब न सांगता ती ऑनलाईन स्वरूपी सादर करणे अनिवार्य आहे, याची दखल घेवून आपल्या कार्यालयातील संबंधितांना ती तात्काळ भरण्याचे आदेश दयावेत.

**टिप्पणी - १) महाविद्यालय/ संस्था यांनी संबंधित ऑनलाईन माहिती दिनांक ०२ जुलै, २०१८ पर्यंत भरल्यानंतर त्याबाबतचे सदर कक्षामार्फत प्रमाणपत्र/हमीपत्र घेण्यात यावे.**
**२) तसेच संबंधित ऑनलाईन माहिती ज्या महाविद्यालय, संस्था यांनी भरलेली असल्यास सदरचे परीपत्रक दुर्लक्षित करावे.**

नोडल अधिकारी/अधिक्षक
(AISHE/MIS Cell)
सांख्यिकी कक्ष

मुंबई - ४०००३२
दिनांक : २९ जून, २०१८